एकमत
आपलं लातूर
रविवार, ७ जून २००९, पान ५

# कार्बन टेट्रा क्लोराईडचा वापर वर्षाखेर बंद होणार

## ओझोन रक्षणासाठी शासनाचा निर्णय



लातूर (प्रतिनिधी) : वसुंधरेचे रक्षण करणाऱ्या ओझोन थरास धोका पोहाचवू पाहणाऱ्या कार्बन टेट्राक्लोराईड या रसायनाचा विविध उद्योगांतील वापर या वर्षाखेर पूर्णपणे बंद केला जाणार असून याविषयी जीटीझेड प्रोक्लीमा ही देशातील उद्योजकांना मोफत मार्गदर्शन करीत आहे.

कार्बन टेट्राक्लोराईडचा वापर पर्यावरण व आरोग्यासाठी कसा घातक आहे व हे विद्राव्य न वापरता त्यासाठी असलेल्या पर्यायी रसायनांचा वापर करावा यासंदर्भात शहरातील उद्योजकांना माहिती देण्यासाठी नॅशनल सीटीसी फेज आऊट प्लॅनच्या निलीमा डिसील्वा लातुरात आल्या होत्या. या वेळी दै. 'एकमत'ने त्यांच्याशी संवाद साधला. सीटीसीचा उपयोग विविध उद्योगांत विविध कारणांसाठी केला जातो. वस्त्रोद्योगात कापडावरील डाग काढण्यासाठी, अभियांत्रिकीत यंत्रातील नको असलेले तेल व ग्रिस नष्ट करण्यासाठी, इलेक्ट्रिक्ल वस्तूमधील जमा झालेला कार्बनचा थर साफ करण्यासाठी, छपाई उद्योगात फिल्म स्वच्छ करण्यासाठी, दागिने निर्मितीत साचे साफ करण्यासाठी याशिवाय ऑक्सिजन सिलेंडर्सचे नोजल स्वच्छ करण्यासाठी याचा उपयोग होतो, असे निलीमा म्हणाल्या. तथापि पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने या विद्राव्याचा वापर धोकादायक असल्याचे त्यांनी सांगितले.

रसायनांचे क्षणात बाष्पीभवन होते. तो वजनास हलका असल्याने आकाशात उंच जातो व सूर्याचे अतिनिल

(पान ७ वर) ▸▸

वरून...

### कार्बन टेट्रा क्लोराईडचा वापर बंद

किरणे रोकणाऱ्या ओझोन थरास घटवतो. एक कार्बन टेट्राक्लोराईडचा अणू ओझोनच्या हजारो अणुचे नुकसान करतो. याशिवाय या रसायनातून तयार झालेला वायू श्वासावाटे शरीरात गेल्यास भोवळ, डोकेदुखी, मळमळ सुरू होते व मज्जासंस्थेवर विपरित परिणाम होतो. तो कार्सिनोजेनिक असल्याने या वायूच्या सतत संपर्कात येणाऱ्या व्यक्तीस विविध प्रकारचे कॅन्सर होवू शकतात.

एकूणच पर्यावरणाच्या दृष्टीने धोकादायक असलेल्या या विद्राव्याचा वापर पुर्णपणे बंद करण्यासाठी व ओझोन थराचे रक्षण करण्यासाठी १९२ देशाप्रमाणे भारतानेही मॉट्रियल करारावर स्वाक्षरी केली व या मूलद्रव्याचा उपयोग थांबविण्याचे मान्य केले. या मूलद्रव्याचा उद्योगातील उपयोग एकदम थांबवणे शक्य नसल्याने त्याचा टप्प्याटप्प्याने वापर कमी करण्यात आल्याचे निलिमा म्हणाल्या. मूलद्रव्याच्या वापराबाबतचे भारतातील १९९८ ते २००० चे चित्र पाहता त्याचा वापर ११ हजार ५०५ टन असा प्रतिवर्षी होता. २००५ पर्यंत तो ८५ टक्के कमी झाला. या वर्षाखेर तो पूर्णपणे बंद करण्यात येणार असून शासनाच्या वतीने सूचनाही या रसायनाचा वापर करणाऱ्या उद्योजकांना देण्यात आल्याचे निलीमा यांनी सांगितले. जर्मन व फ्रान्स सरकारच्या वतीने जीटीझेड प्रोक्लीमा लघू उद्योजकांना मार्गदर्शन करीत असून या प्रकल्पांतर्गत सीटीसीला पर्याय असणारे ३० पर्यायी स्टेन रिमूवर्स जीटीझेडने शोधून काढले आहेत. सीटीसीच्या तुलनेत ते स्वस्त व परिणामकारक असल्याचे निलीमा म्हणाल्या. याबाबत अधिकाधिक जनजागरणासाठी जीटीझेडच्या वतीने मोफत परिषदा, परिसंवाद होत असून यावर माहिती पुस्तिकाही काढण्यात आल्या आहेत. www.ctc-phaseout.org या संकेतस्थळावर सर्वांसाठी माहिती उपलब्ध करून देण्यात आल्याचे निलीमा यांनी सांगितले.